# देव कसा आहे हे आम्हांला दाखवण्यासाठी येशूने वृत्तांतांचा उपयोग केला

मुलांना शिकवणायांनी S7b हा अभ्यास वाचावा.

## 1. येशूच्या वृत्तांतांमधून देवाविषयी शिकण्यास आपल्य अंत:करणाची तयारी करा.

''प्रिय प्रभू, तू जगाला सुवार्ता सांगण्यासाठी येशूला पाठवलेस याबद्दल धन्यवाद, त्याच्या वृत्तांतांमुळे आम्हांला तुझा संदेश समजण्यास मदत झाली. हे अद्‌भुत वृत्तांत इतरांना सांगण्यास आमचे साहय्य कर.''

येशू हा जगातील सर्वात प्रभावी असा संदेष्टा होता. आपले संदेश लोकांना समजावेत यासाठी येशूने सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील सामान्य, दैनंदिन कार्यांची उदाहरणे देणरे खरे वृत्तांत तसेच दृष्टांतांचा उपयोग केला. वृत्तांत लोकांना समजण्यास, लक्षात ठेवण्यास आणि इतरांना सांगण्यास सोपे असतात म्हणून येशूने वृत्तांतांचा उपयोग केला. त्याच्या वृत्तांतातून लोकांना सत्य समजले. लोकांच्या दृष्टीने ते इतके मोलवान होते की त्यांनी ते मोठया उत्सुकतेने आपल्या कुटुंबाला आणि मित्रमंडळीला सांगितले. यहूदी लोकांमध्ये सुवार्ता वेगाने पसरली गेली. पुढे दिलेली काही सत्ये येशूच्या वृत्तांतांतून आम्हांला प्रकट झाली आहेत.



- देव पुष्कळदा गूढ, रहस्मय प्रकारे कार्य करतो. येशूचे वृत्तांत ह्या गूढ, रहस्यमय गोष्टींची तुलना झाडांची वाढ व इतर गोष्टींशी करतात. त्यामुळे रहस्य उलगडले जाते आणि मनुष्याला ते सहजपणे समजते.
- जी माणसे लोकांच्या दृष्टीने अशक्य किंवा बिनमहत्वाची असतात अशाच लोकां बरोबर देव कार्य करतो.
- येशूचा संदेश हा, कित्येक धार्मिक संदेशांसारखा नव्हता तर ताजा टवटवीत आणि प्रभावी होता.
- येशूने आम्हांला सांगितले की देव आमचा शोध घेत आहे, आमच्या पातकांपासून आमची सुटका करण्याची त्याची इच्छा आहे.
- आम्ही पश्चात्ताप करुन येशूवर विश्वास ठेवतो तेव्हा त्याच्याद्वारे देव आमचे तारण करतो.
- देव आमच्यावर काम सोपवतो. आम्ही त्याची सेवा भीतीने नाही तर आनंदाने करावी अशी त्याची इच्छा आहे.
- देव त्याची सेवा करणायांना महान प्रतिफळ देणार आहेतर त्याला नाकारणायांना शिक्षा करणार आहे.

येशूने आपल्या राज्याची सत्ये प्रकट केली आहेत. त्यासाठी त्याने वापरलेल्या सहा वृत्तांतांची उदाहरणे पुढे दिली आहेत ती कृपया वाचा. प्रत्येक वृत्तांत वाचून झाल्यावर तो समजावा यासाठी देवाची मदत मागा. प्रत्येक वृत्तांतात, तुम्हांला देवाची ओळख होण्यास मदत होईल असे वचन आणि तुम्ही काय करावे अशी त्याची इच्छा आहे याबद्दल समजेल.

**पाहा मत्तय 13:31-35** मध्ये मोहरीच्या दाण्यापासून तुम्ही काय शिकावे अशी देवाची इच्छा आहे.

- खमीर आणि मोहरीचा दाणा ही कशाची प्रतिके आहेत.
- देवाच्या राज्याची सुरुवात कशी होते आणि त्याची वाढ होते तेव्हा काय घडते.

**पाहा लूक 5:36-38** मध्ये जुने वस्त्र आणि जुना बुंधला यांचा वृत्तांत.

- नवे ठिगळ आणि नवा द्राक्षारस ही कशाची प्रतिके आहेत.
- येशूच्या संदेशाची तुलना इतर किंवा जुन्या धार्मिक संदेशांची केली आहे. पाहा लूक 15:8-10 मध्ये हरवलेल्या नाण्याचा दृष्टांत.

**पाहा लूक 15:8-10** मध्ये हरवलेले नाणे वृत्तांत.

- स्त्री आणि हरवलेले नाणे कशाचे प्रतिक आहे.
- देव हरवलेल्यांना किती तत्परतेने शोधतो आणि ते सापडल्यावर तो काय करतो.

**पाहा लूक 18:10-14** मध्ये पश्चात्ताप करणाऱ्या जकातदाराचा वृत्तांत.

- परुश्यांच्या दृष्टीकोनाने देवाचे समाधान झाले नाहीं.
- आम्ही कशा प्रकारे आले पाहिजे.

**पाहा मत्तय 24:45-51** मध्ये विश्वासू सेवकाचा वृत्तांत.

- विश्वासू सेवक हे कशाचे प्रतिक आहे आणि त्याचे काम काय दर्शविते.
- आम्ही देवाची सेवा या दृष्टीकोनातून करतो.

**पाहा मत्तय 25:1-13** मध्ये लग्नाच्या मेजवानीचा वृत्तांत:

- ख्रिस्ताची विश्वासूपणे सेवा करणाऱ्यांसाठी काय वाट पाहात आहे आणि त्याची सेवा करण्यात अपयशी ठरणाऱ्यांसाठी काय वाट पाहात आहे.
- लग्नाची मेजवानी कशाचे प्रतिक आहे. (या बरोबर अधिक मदत व्हावी यासाठी प्रकटी. 19:1-10 पाहा).

आपणसुद्धा, देवाचे सत्य सांगण्यासाठी जुन्या व नव्या करारांतून पवित्र शास्त्रातील वृत्तांत सांगितले पाहिजेत. हे वृत्तांत वाचून दाखवता येतात, लक्षात ठेवून सांगता येतात, गीतांद्वारे गाऊन, नाट्यीकरण करुन दाखवता येतात किंवा चित्रमालिकेतून दाखवता येतात.

## 2. सहकाऱ्यांशी चर्चा करुन येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रम ठरवा.

- विश्वासणारे आणि अद्याप ख्रिस्ताला न ओळखणारे लोक अशा दोघांचीही भेट घ्या. त्यांच्या गरजांना अनुरुप ठरतील असे वृत्तांत त्यांना जुन्या व नव्या अशा दोन्ही करारांमधून सांगा. ह्या वृत्तांतांमधील, सत्ये तुम्ही आणि ऐकणाऱ्यांना कशा प्रकारे प्रत्यक्ष आचरणात आणता येतील हे दाखवण्याची देवाला विनंती करा.
- मुलांना पवित्र शास्त्र शिकवणाऱ्यांची भेट घ्या. येशूने सांगितलेले वृत्तांत आणि पवित्र शास्त्रातील इतर वृत्तांत मुलांना कशा प्रकारे सांगता येतील याबद्दल त्यांना योजना आखण्यास साहाय्य करा. मुलांनी वृत्तांत पाठ करावेत, त्यांचे नाटयीकरण करावे किंवा गीतांतून सांगावेत. त्यांना हे वृत्तांत चित्ररुपाने काढून त्याखाली कविता लिहिता येतील.
- तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन इतरांना येशू विषयी शिकवतांना आणि सांगताना त्यांना पवित्र शास्त्रातील वृत्तांतांचा कसा उपयोग करता येईल ते पाहा. तुमच्या संस्कृतीतील लोकांना सुवार्ता अगदी उत्तम प्रकारे समजेल असेच वृत्तांत निवडा. पवित्र शास्त्रातील वृत्तांत सांगणारे प्रशिक्षण साहित्य आणि सुवार्ता सांगण्याच्या साधनांचा उपयोग करा.
- पवित्र शास्त्रातील वृत्तांत आपल्या मित्रमंडळीला कशा सांगायचा हे मंडळीच्या सदस्यांना उपासनेच्या दरम्यान प्रत्यक्ष दाखवा. त्यांना, नाटिका, कविता आणि चित्रांच्याद्वारे, वृत्तांत सांगण्याची संधी द्या. चित्र काडढण्याची कला असणाऱ्या विश्वासणाऱ्यांना वृत्तांतांची चित्रे काढायला सांगा.

## 3. आगामी उपासनासभेसाठी सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना आखा.

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रिवाजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.

तुम्ही अभ्यास केलेल्या येशूच्या दाखल्यांपैकी एक किंवा अधिक दाखले सांगा अथवा नाटिकेतून दाखवा. हे वृत्तांत आज तुमच्या स्वत:च्या संस्कृतीत घडले तर ते कशा प्रकारे सांगितले जातील याबद्दल लोकांना कल्पना करण्यास सांगा.

वरील भाग 1 मधील मुलांसंबंधी प्रश्न विचारा.

येशूने आपल्या वृत्तांतांतून देवाविषयीची सत्येशा प्रकारे प्रकट केली ते स्पष्ट करा. त्यापैकी काही सत्यांचा उलगडा करुन सांगा.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी येशूने** मत्तय 25:1-13 मध्ये सांगितलेल्या लग्नाच्या मेजवानीला गेलेल्या शहाण्या आणि मूर्ख कुमारींच्या वृत्तांताचा उपयोग करा. प्रभुभोजन आम्हांला येशूच्या बरोबरच्या लग्नाच्या मोठया मेजवानीचा नमुना दाखवते. स्वर्गातील आमचे प्रतिफळ हेच असणार आहे.

मुलांनी तयारी केलेली नाटिका, कविता आणि प्रश्न सादर करण्याची त्यांना संधी द्या.

देवाने पवित्र शास्त्रातील वृत्तांतांच्याद्वारे विश्वासणाऱ्यांना देवाविषयीची सत्ये कशी प्रकट केली आणि इतरांना सुवार्ता सांगण्यास कसे साहाय्य केले, याबद्दल त्यांना साक्ष देण्यास सांगा.

दोन किंवा तीन जणांचे गट तयार करा. यात एकमेकांसाठी प्रार्थना, मार्गदर्शन करा. तसेच येशूने सांगितले वृतांत शिकणे आणि ते मित्रांना व कुटुबियांना सांगण्यासाठीच्या त्यांच्या योजनांना मंजूरी द्या.

**पाठ करा. योहाना 8:12**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net